आजचा दिनविशेष
१९४७ : जवळपास १९० वर्षांच्या ब्रिटीश कंपनी आणि राजसत्तेनंतर भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ | अंक २३७ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



‘पाण्यावर अधिकार फक्त आणि फक्त भारताचा’ “हा कसला करार होता. मागच्या सात दशकापासून माझ्या देशातील शेतकऱ्यांच अकल्पनीय नुकसान केलय. आता हिंदुस्थानच्या हक्काच्या पाण्यावर अधिकार फक्त आणि फक्त भारताचा आहे. भारताच्या शेतकऱ्यांचा आहे. भारत अजिबात सध्याच सिंधू कराराच स्वरुप पुढे सहन करणार नाही. शेतकरी हित आणि राष्ट्र हिताच्या दृष्टीने आम्हाला हा करार मंजूर नाही” असं पंतप्रधान मोदींनी सांगितलं

# न्यूक्लियर ब्लॅकमेलिंग सहन करणार नाही, मोदींचा पाकिस्तानाला सर्वात मोठा इशारा

## पाण्यावर अधिकार फक्त आणि फक्त भारताचा

“आज स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने मला ऑपरेशन सिंदूरच्या शूरवीर सैनिकांना सॅल्यूट करण्याची संधी मिळाली. भारताच्या वीर सौनिकांनी शत्रुला त्याच्या कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा दिली आहे. पहलगामध्ये सीमेपलीकडून आलेल्या दहशतवाद्यांनी ज्या प्रकरे धर्म विचारुन लोकांची हत्या केली, पत्नीसमोर पतीला मारलं, मुलांसमोर वडिलांना मारलं. संपूर्ण हिंदुस्थानात आक्रोश होता. संपूर्ण जगाला या घटनेमुळे धक्का बसलेला. माझ्या प्रिय देशवासियानो ऑपरेशन सिंदूर त्या आक्रोशाची अभिव्यक्ती आहे” असं पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वातंत्र्य दिनाच्या संबोधनात म्हणाले. ते लाल किल्ल्यावरुन 79 व्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात बोलत होते. “22 तारखेला आम्ही आमच्या सैन्याला खुली सूट दिली. रणनिती ते ठरवतील, लक्ष्य ते ठरवतील, वेळ त्यांनी निवडली आणि आपल्या सैन्याने ते करुन दाखवलं, जे अनेक दशकं झालं नव्हतं” असं पीएम मोदी म्हणाले. “शत्रूच्या प्रदेशात घुसून त्यांची दहशतवादी हेड क्वार्टस धुळीस मिळवली. दहशतवाद्यांच्या इमारती खंडर बनल्या. पाकिस्तानची झोप उडालेली आहे. पाकिस्तानात झालेलं नुकसान इतकं मोठं आहे की, रोज नवनवीन खुलासे होत आहेत. नवीन माहिती समोर येत आहे” असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. “आपला देश अनेक दशकापासून दहशतवाद सहन करत आहे. देशाच्या छातीवर त्यांनी वार केले. यापुढे आम्ही दहशतवादी आणि त्या दहशतवाद्यांच पालन पोषण करणाऱ्यांना, त्यांना ताकद देणाऱ्यांना वेगळं मानणार नाही. ते मानवतेने शत्रु आहेत. त्यांच्यात काही फरक नाही” असं पीएम मोदी म्हणाले. “भारताने ठरवलय न्यूक्लियरच्या धमक्यांना आम्ही सहन करणार नाही. न्यूक्लियर ब्लॅकमेल बऱ्याच वर्षांपासून सुरु आहे. आता ब्लॅकमेलिंग सहन करणार नाही. पुढेही जर शत्रुने प्रयत्न सुरु ठेवला, तर आमचं सैन्य ठरवेल, सैन्य ती वेळ, त्यांची पद्धत ठरवतील. ते लक्ष्य ठरवतील त्यानुसर आम्ही त्याची अंमलबजावणी करु. आम्ही सडेतोड उत्तर देणार” अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला ठणकावलं. “माझ्या प्रिय देशवासियानो भारताने ठरवलय आता रक्त आणि पाणी एकत्र वाहणार नाही. देशवासियांना समजलय, सिंधूचा करार किती अन्यायकारक आहे, एकतर्फी आहे. माझ्या देशातील शेतकरी पाण्याशिवाय तहानलेला आहे” असं पीएम मोदी म्हणाले.

### होळ येथे आयपीएस अंकुशराव शिंदे यांचा रविवारी होणार सेवापूर्ती सन्मान सोहळा

# कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांचे आवाहन

केज (प्रतिनिधी) दि.१४ : तालुक्यातील होळचे सुपुत्र, राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांनी सेवानिवृत्तीला ४ महिने शिल्लक असताना स्वेच्छानिवृत्ती घेतली. यानिमित्ताने त्यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा होळ येथे रविवारी (दि.१७) सकाळी १०.३० वाजता हनुमान मंदिरात ग्रामस्थांच्यावतीने आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अश्विनीताई शिंदे ह्या असतील. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राजस्थानचे माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे, मांजरा कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्तासाहेब शिंदे, माजी सरकारी वकील ॲड.प्रकाश शिंदे, माजी अपर जिल्हाधिकारी अण्णासाहेब शिंदे, पुणे सीआयडीचे पोलीस उपाधीक्षक दीपक शिंदे, नागपूरचे महावितरण कंपनीचे माजी मंडळ अभियंता लक्ष्मण खाडे, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, केंद्रप्रमुख रमेश कांबळे, प्रा. डॉ.ज्ञानोबा सरवदे, बारामती ॲग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक



धर्मराज शिंदे, हृदयरोग तज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन सर्व ग्रामस्थांनी केले असून परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सेवानिवृत्त विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांच्या कार्याचा गौरव करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. दरम्यान, होळच्या मातीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसह विशेष पाहुण्यांच्या उपस्थितीत होणारा हा सोहळा गावासाठी अभिमानाचा क्षण ठरणार आहे.

# राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा कार्यक्रम

बीड, दिनांक 14 : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. दिनांक 15 ऑगस्ट रोजी सकाळी 7.00 वाजता शासकीय विश्रामगृह येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी राखीव, सकाळी 8.55 वाजता मोटारीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण. 9.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नगर रोड बीड येथे आगमन. सकाळी 9.05 वाजता



भारताचा 79 स्वातंत्र्य दिन संमारभ- ध्वजारोहण समारोहास उपस्थित राहतील. तसेच सकाळी 10.45 वाजता रानभाजी कृषी कार्यक्रमाचे उद्घाटन करतील. सकाळी 10.50 वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन करतील. दुपार नंतर मोटारीने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

******



बीड :- छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस,कारंजा रोड,बलभीम चौक,जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतच्या रस्त्याचा काम तात्काळ सुरू करण्यात यावा या मागणीसाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने नगरपरिषद कार्यालय बीड येथे बेमुदत धरणे आंदोलन होते तरी मा.मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी लिखित स्वरूपात लवकरच रस्त्याचा काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले असता आंदोलन स्थगित करण्यात आले.यावेळी उपमुख्य अधिकारी सम्राट कदम यांच्याकडून पत्र स्वीकारताना मनसेचे वर्षा जगदाळे (महिला राज्य उपाध्यक्ष),आशा कुटे (महिला बीड जिल्हाध्यक्ष),सदाशिव बिडवे (जिल्हा उपाध्यक्ष), आकाश सुरवसे,(सहकार सेना जिल्हाध्यक्ष),कल्पना कवठेकर (महिला जिल्हा उपाध्यक्ष),सुनिता सोनवणे,पठाण अमर जान (बीड शहराध्यक्ष),स्वराज मस्के सह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते छायाचित्र दिसत आहे.

# शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग: खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत मांडला प्रश्न, केंद्रीय मंत्री गडकरींनी दिले उत्तर

बीड: शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी मधील परतूर ते कळंबपर्यन्तचा मार्ग बीड जिल्ह्यातून जातो. या टप्प्यातील अपूर्ण कामे, जोड-रस्ते व अडथळ्यामुळे थांबलेली कामे, रस्ता बांधकामाचा सुमार दर्जा व त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयी व अपघात याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत प्रश्न उपस्थित केला होता. रस्ते कामाचा सुमार दर्जा, तांत्रिक दोष आणि ठेकेदारांची मनमानी याबाबतही खा.सोनवणे यांनी खंत व्यक्त केली. या प्रश्नाला केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी उत्तर दिले असून अपुर्ण कामे तातडीने पुर्ण करण्याचे तसेच कामाच्या दर्जाबाबतही आश्वासन दिले आहे. रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी उत्तरात म्हटले आहे, शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी या महामार्गाचा एकूण ७२० किमीपैकी ७०८ किमीचा रस्ता पूर्ण झाला असून उर्वरित १२ किमीचे काम विविध टप्प्यांवर आहे. हे काम टप्प्याटप्प्याने २०२७-२८ पर्यन्त पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. परतूर-माजलगाव (किमी ५१-१०१) टप्पा २०१७ मध्ये सुरू होऊन ३१ जुलै २०१९



पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, विद्यमान महामार्ग प्राधिकरणाशी वाद, जमिनीचे अधिग्रहणातील विलंब आणि अन्य पूर्वतयारीतील अडचणींमुळे सहा वर्षे हे काम रखडले आहे. माजलगाव तालुक्यातील सादोळा गावाजवळ ६०० मीटर रस्ता स्थानिक विरोधामुळे अद्याप अपूर्ण आहे तो तातडीने पूर्ण करुन घेण्यात येईल. माजलगाव-केज आणि केज-कळंब टप्प्यांसाठी ९३८.३५ कोटी रुपये मंजूर असून आतापर्यंत ६९० कोटी रुपये खर्च झाले आहेत. या टप्प्यातील उर्वरित काम डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या महामार्गातील धारुर घाटातील पर्यायी मार्गाचे काम तसेच बर्दापूर-लोखंडी सावरगाव दुहेरीकरणाचे काम नियोजनानुसार वेळेत व मानकानुसार करुन घेण्यात येईल, असेही म्हटले आहे.

# शिवाजी शिक्षण शाळेत कृष्ण जयंतीचा उत्साह !



गणेश हिरवेमुंबई प्रतिनिधी घाटकोपरच्या पंतनगर येथील शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये मराठी सण, संस्कृती व परंपरा जपण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष शरद फाटक व संस्थेचे इतर पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार आणि सहकार्याने अनेक उपक्रम दरवर्षी शाळेमध्ये आयोजित केले जातात. सालाबादप्रमाणे यावर्षी सुध्दा आज दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी इयत्ता पहिली ते चौथीच्या सेमी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या वतीने कृष्णजन्मोत्सव व दहिहंडी हे उत्सव एकत्रितरित्या मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आले. आज इयत्ता पहिली ते चौथी या वर्गांतील अनेक मुली-मुले राधा- कृष्ण यांच्या वेषात उपस्थित होते. आज कृष्णजन्मोत्सव व दहीहंडी अशा दोन्ही सणांबद्दल सर्व वर्गातून माहिती सांगण्यात आली. त्यानंतर उपस्थित विद्यार्थी व शिक्षक यांनी एकत्रित हे सण साजरे केले. त्याचप्रमाणे भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त “घरोघरी तिरंगा” हा उपक्रमही यानिमित्ताने आज साजरा करण्यात आला. यावेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रवींद्र बडवे व समस्त शिक्षकवृंद उपस्थित होते.

# १५ ऑगस्ट निमित्त बीडमध्ये मोफत आरोग्य शिबिर, गरजू रुग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा.

## बीडमध्ये उद्या तीन ठिकाणी नेत्र तपासणी, दंत तपासणी, लहान मुलांची तपासणी आरोग्य शिबीर.

बीड प्रतिनिधी : आरोग्य सेवा हीच ईश्वर सेवा मानत बीड जिल्ह्यामध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 15 ऑगस्ट दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, खासदार श्रीकांतजी शिंदे साहेब, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब, उपमुख्यमंत्री सहायता कक्ष प्रमुख श्री. मंगेशजी चिवटे साहेब, युवासेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष बीड शहर, तसेच बाजीराव दादा चव्हाण युवा मंच. धर्मवीर प्रतिष्ठान महा. राज्य. यांच्या संयुक्त विद्यमानाने बीड शहरामध्ये तीन ठिकाणी उद्या 15 ऑगस्ट दिनानिमित्त मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन रुग्णसेवक रोहित धुरंधरे यांनी केले आहे. हे शिबिर बीड शहरातील नामांकित तीन हॉस्पिटल येथे होणार आहे. तरी उद्याच्या मोफत शिबीराचा लाभ घेण्यासाठी नीरा हॉस्पिटल, डीपी रोड, बीड येथे लहान मुलांच्या तपासण्या होणार आहेत. नीरा हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध डॉ, राऊत सर यांच्यामार्फत लहान मुलांच्या तपासणी व सहा महिन्याच्या आतील लहान बालकांच्या आजाराचे निदान महात्मा ज्योतिबा फुले योजने



अंतर्गत मोफत करण्यात येणार आहेत. तसेच सिद्धिविनायक सुपर मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल बीडचे सुप्रसिद्ध डॉक्टर मनोज पवार सर यांच्या मार्फत डोळ्यांच्या तपासण्या 50% सवलतीच्या दरात तसेच डोळ्यांच्या इतर आजारांच्या शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत मोफत केल्या जाणार आहेत. तसेच लोकसेवा डेंटल क्लिनिक बीडचे सुप्रसिद्ध डॉ, किरण वनवे, व डॉ, भक्ती वनवे यांच्या मार्फत दंत रोगाच्या मोफत तपासण्या ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे उद्याच्या मोफत माहाआरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त संख्येने गरजू रुग्णांनी लाभ घेण्यासाठी रुग्णांनी नीरा हॉस्पिटल, लहान मुलांचे, डीपी रोड बीड, डोळ्यांच्या तपासणीसाठी सिद्धिविनायक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, तहसील कार्यालय समोर, बीड, तसेच लोकसेवा डेंटल क्लिनिक, नगर नाका, बीड, येथे उद्या दिनांक 15 ऑगस्ट रोजी सकाळी 11 ते 2 या वेळेत येऊन या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यायचा आहे. असे आवाहन रुग्ण सेवक रोहित धुरंधरे यांनी केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

## स्व-विकास



जिथे आपल्या असण्याला किंमत आहे तिथेच आपल्या अस्तित्वाची हजेरी निश्चित लावावी. स्व -विकास होतो.

सूर्य रोजचा तोच आहे आजही तोच आहे, कालही तोच होता, आणि भविष्यातही तोच असणार आहे.

त्याचं येणं जरी रोजच आहे तरीसुद्धा तीव्र उन्हामध्ये आपल्याला त्याचा तिटकारा येतो. उन्हामुळे त्रास होतो. आणि याच सूर्यामुळे  कडाक्याच्या थंडीत मात्र सूर्याचे तापमान हवे हवेसे वाटते.

स्वतःची एक किंमत तयार करा आपण जेव्हा प्रत्येकासाठी पाहिजे त्या कारणासाठी, पाहिजे त्यावेळी कोणत्याही सबबी  शिवाय उपलब्ध राहतो, अशावेळी समोरची व्यक्ती आपल्याला गृहीत धरत असते.

याची दुसरी बाजू नकारात्मक आहे ते म्हणजे आपल्या वेळेची किंमत कोणालाही नसते. आपण त्यांच्यासाठी वेळ दिला म्हणजे आपणच आपल्या वेळेचा किती अपमान करतो हे आपण ठरवावे. स्वतःच्या वेळेची किंमत व इतरांच्या वेळेचा अपमान करणारी अशा बऱ्याच गोष्टी आपल्या जीवनात असतात.

मराठीत एक सुंदर म्हण म्हणण्यापेक्षा एक विचार आहे, 'स्वाभिमान विकून  मोठं होण्यापेक्षा अभिमान बाळगून लहान राहिलेले केव्हाही चांगलं.'

जगाच्या नजरेत आपल्याला चांगलं ठरवण्यासाठी, समाजाला आपल्याला खाल्ल्यावर घेऊन मिरवा व अशा शुल्लक अपेक्षा साठी काही लोक स्वतःचा स्वाभिमान  गहाण ठेवायला तयार असतात. अशा लोकांपासून सावध राहावे.

काही लोक असे असतात की स्वतःच्या विचारांमध्ये गर्क असतात त्यांना गर्दी नको असते स्वतःच्या छोट्या विश्वात रममाण असतात आणि त्यातच स्वर्ग सुखाची अनुभूती घेणारे असतात.

स्वतःच जगणं संपन्न करण्यासाठी आणि अधिक समृद्ध करण्यासाठी आपल्यासाठी हवी असणारी योग्य तत्व निवडण्यासाठी योग्य लोकांचा योग्य सल्ला, योग्य मार्गदर्शन घेऊनच ठरवली पाहिजेत आपल्या तत्वांशी आपण ठाम राहिलं पाहिजे आणि अशा निर्मळ व्यक्तीचं अनुकरण केलं पाहिजे.

थोडक्यात काय तर कोणतंही कृत्य, काम पूर्ण बरोबर किंवा पूर्ण चुकीचं असतं असं नाही त्याकडे आपण कसं पाहतो त्याचं अनुकरण आपण कसं करतो त्यावर बऱ्याश्या गोष्टी अवलंबून असतात आपली तत्व आपले विचार कसे योग्य आहेत हे आपण समोरच्याला त्यावेळी खात्रीने पटवून देता आलं पाहिजे.

आपल्या अंतर्मनाला या तत्त्वाचे महत्त्व कळलं पाहिजे आणि प्रत्येकाला खुश ठेवणं प्रत्येकाचं मन राखणं यासारख्या निरर्थक गोष्टींना आपण अवाजवी महत्त्व देत बसतो हे खरं आहे पण आपल्या अस्तित्वाच आपणच विसर्जन करू नये. लोकांना खुश ठेवणं हे चुकीचं नाही पण समोरच्याच्या सुखासाठी आपण आपलं सुख समाधान पणाला लावणे, चुकीच्या गोष्टी आत्मसात करणे हे नक्कीच चुकीचे आहे. त्यासाठी सर्वांसाठी सर्व करा पण ते सर्व करताना आपलं सर्वस्व बाजूला ठेवण्याची वेळ येणार नाही याची न विसरता काळजी घ्यावी आणि हाच आपल्या माणूसपणातला आपण दिलेला सर्वांगीण न्याय आहे असे मला तरी वाटते.

- स्वतः आहे असेच राहा.
- इतरांना सुख वाटण्याचा प्रयत्न करा.
- आनंद वाटण्याचा प्रयत्न करा.
- कोणालाही आपल्यामुळे डोकं होणार नाही याची काळजी घ्या.
- माणूस म्हणून जन्माला आला तर माणसासारखेच माणसाशी वागा.

**वसुधा वैभव नाईक**
**धनकवडी, जिल्हा- पुणे**
**मो. नं. 9823582116**

# स्वातंत्र्याच्या पर्वावर क्रांतिकारकांचे बलिदान आठवा...!

स्वातंत्र्याची रम्य पहाट झाली. असंख्य बलिदानाचे सार्थक झाले आणि आपल्या भारत मातेला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्तता मिळाली.  आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या महान नेत्यांनी  क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. अशा सर्वांना मी वंदन करते. आपल्या भारत देशात सर्व जाती-धर्माचे लोक एकजुटीने राहतात. त्यामुळे आपला देश सर्व धर्म समभाव असलेला देश म्हणून जगात ओळखला जातो. "भारत माझा देश आहे सारे भारतीय माझे बांधव आहेत." अशी आपण अभिमानाने आणि गर्वाने प्रतिज्ञा करतो.  देशाच्या स्वातंत्र्यासाठी  महान नेत्यांनी,क्रांतिकारकांनी ब्रिटिशांशी लढून आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले. हजारो शूरवीरांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. त्यांना अथक संघर्ष करावा लागला या अन्यायाच्या अत्याचाराच्या विरोधात लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू,  चंद्रशेखर आजाद, सरदार वल्लभाई पटेल, मंगल पांडे, सुभाष चंद्र बोस,राजगुरू, सुखदेव,लाला लचपतराय, झाशीची राणी लक्ष्मीबाई अशा हजारो क्रांतिकारकांनी शूर वीरांनी देशासाठी खूप मोठे योगदान दिले. आणि अखेर 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत देश स्वतंत्र झाला.आपण खुप नशिबवान आहोत की, आपला  जन्म भारत देशात झाला.त्या शूरवीरांच्या बलिदानामुळे आजचा हा स्वातंत्र्य दिन मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा करीत आहोत. कारण आपल्या देशाचे वीर जवान तिकडे सीमेवर स्वतःचा जीव धोक्यात घालून शत्रूशी सामना करण्यासाठी खडा पहारा देत आहेत. या सैनिकांना माझा सलाम. आपला भारत देश विज्ञान तंत्रज्ञान,खेळ,व्यापारी अशा अनेक क्षेत्रात मोलाचे काम करत आहे.भारत देश दिवसेंदिवस प्रगतीपथावर आहे. परंतु समाजात गुन्हेगारी भ्रष्टाचार गरिबी आणि अस्वच्छता यांचे प्रमाण वाढत आहे. स्वतःच्या घरात सुद्धा मनुष्य हा सुरक्षित नाही.आपला भारत देशाने स्वातंत्र्याचा  अमृतमहोत्सव साजरा केलेलाच आहे. आणि सर्वांच्या आनंदाला उधाण होते . आणि ते स्वाभाविकही आहे. लाल किल्या पासुन ते गाव खेड्यापर्यंत देशभक्तीचा जल्लोष नेहमीप्रमाणे ओसंडून वाहत होता . भारत माता की जय' असे नारे दिले जात होते .आज आपल्याला भारतभूमी विषयी ही विलक्षण आस्था खूप महत्त्वाची आहे.ह्या दिवशी सर्व भारतीय एकत्र येतात. एकतेचे दर्शन आपणास बघायला मिळते. आपल्या देशाची संस्कृती प्राचीन आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचा मोठा इतिहास आपल्यापुढे उभा आहे. हे  सुमारे दीडशे वर्षाचा पारतंत्र्य आणि त्यातून  मुक्तेतेसाठी व्यापक संघर्ष आपण सर्वजणाना  ठाऊकच आहे. सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य यांचा आपल्याला अभिमान आहे. साडे सात दशकात स्वातंत्र्य आपण अनुभवले आहे. ज्ञान विज्ञानाच्या सर्व क्षेत्रात आपल्या देशाने अभूतपूर्व वाटचाल केली आहे. सर्वांनी सर्वार्थाने सुसज्ज आणि सुसंस्कृत देश म्हणून आपली जगात ओळख आहे. आपला देश सामर्थ्यशाली आहे. लोकशाही हे जगण्याचे एक सर्वोच्चमूल्य आहे. आपण लोकशाही नागरिक म्हणून लोकशाही भारताचे नागरिक आहोत.आज आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 78 वर्षे झालीत.  स्वातंत्र्याचा काळ जसा-जसा पुढे पुढे सरकत जातो,तसा-तसा देशाचा इतिहास अधिक प्राचीन होत असतो.अमृत महोत्सवी वर्ष हा काळाचा एक मोठा टप्पा होता . आणि आता त्यात दोन शतकांचा अतिभव्य इतिहास सामावलेला आहे.पण धर्मनिरपेक्षतेच्या दलदलीत सापडलेल्या सुशिक्षित तरुणांचा उद्रेक झाला आहे.आपण त्यांना कसं समजावून घेणार आहोत. प्रगतशील कृषी राष्ट्र ही आपल्या देशाची ओळख असली तरी, शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा काय? एकीकडे बघण्याचा आपला पारंपरिक दृष्टिकोन खरंच बदलला आहे का ?की तो अधिक प्रदूषित झाला आहे. पुरोगामी विचाराचे स्मरण करणारे आपण आपल्या व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात खरच आधुनिक  झालो आहोत काय.? जात



धर्म आणि आर्थिक धार्मिक सामाजिक क्षेत्रात असलेली मक्तेदारी मोडीत काढली म्हणजे प्रगती नसते. त्या क्षेत्रात शिरकाव केल्यानंतर नैतिकतेने वागणे महत्त्वाचे असते. पण ही नैतिकता जपली नाही तर स्वैराचारही  झाले. ती मनमानी झाली.

स्वातंत्र्यानंतर साडेसात दशकात आपण नेमके काय मिळवले. आणि काय गमावले याचा विचार करायला हवा. देशात आणि राज्यात सत्तांतरे झाली. विविध विचार आणि संघटना उदयाला आले.मूल्यांकन, राजकारण हळूहळू बाद होत आहे.  नेहरू ते मोदी हा स्वातंत्र्योत्तर भारताचा प्रदिर्घ प्रवास आहे.हा प्रवास विविध वाटा आणि वळणाचा आहे. संघर्षाचा आहे वर्तमान भारताकडे पाहिले तर आपल्याला नेमकं काय  दिसतं मतांसाठी जात,धर्म प्रदेश,महापुरुषांना भेट देण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणात होऊन झाला आहे. विचारांच्या तत्त्वज्ञानांचा नवा संहिता निर्माण होत आहेत. सत्य आणि सौंदर्याची नवी लिपी लिहिली जात आहे. एकमेकावर गोळ्या झाडल्या, नेत्यांना, विचारवंतांना ठार केले. हिंदू-मुस्लीम वगैरे तिरस्कारांची शब्द झाले आहे. प्रादेशिक स्तरावर ब्राह्मण,मराठा, दलित ,ओबीसी, भटके, आदिवासी  अशा परस्पर लढाया सुरू झाल्या आहेत. एकीकडे आर्थिक समृद्धीचे महाकाव्य इमारती रचल्या जात असतांना आमच्या आत्मीय संबंधाचा विटा मात्र विपरीत विस्कटून टाकले आहेत. आपल्याला निर्भयपणे, तटस्थपणे लिहिता येत नाही. सत्य बोलता येत नाही. टिळक-आगरकर गांधी-नेहरू इत्यादींनी आपल्या संस्कृतीतील देदीप्यमान पान आहेत सर्वार्थाने पराभूत करणाऱ्या काळात या महामानवाने इंग्रजी सत्तेच्या  धूर्तपणाला प्रतीत्तर दिले आहे. आणि स्वातंत्र्याची गुढी उभारली. देश संपन्न असला तरी तो अजूनही परिपूर्ण नाही. गावखेड्यात वर्तमान अत्यंत बलक झाला आहे. शाळा,वीज, पाणी, रस्ते ,आरोग्य गरिबांना श्रमीकाना  अजून पोटभर अन्न देऊ शकले नाही.आदिवासीचे कुपोषण अजूनही थांबले नाही .

सध्याचा काळ हा अनेक अरिष्ठांचा भयावह काळ आहे. या काळाने आपल्याला सर्वार्थाने शूद्र ठरविले आहे. भ्रष्ट राजकारण आणि भ्रष्ट लोकशाही या दोन गोष्टींना मान्यता मिळत असेल तर ती अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. काय भव्य असुरक्षितता, अत्याचार, बलात्कार, भ्रष्टाचार या गोष्टी तर आपल्या समाजातून वजा होत नसेल तर नव्या समाजाची पुनर्रचना करण्याची तरी कशी, नवी मूल्य रुजवायची कशी धर्मनिरपेक्ष,समाजवादी, लोकशाही बोलायला रूजवायला छान  वाटतात.पण आज ह्याच धरतीवर अक्षरशः निवस्त्र करून त्यांच्यावर सामूहिक दुष्कर्म केल्याची अत्यंत धक्कादायक घटना घडत आहे.  हे कुठेतरी थांबले पाहिजे. अत्याचार करणाऱ्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे.गरजूंना मदतीचा हात मिळला पाहिजे.तेव्हाच खरा भारत उभा राहील.या वास्तवाची जाणीव ठेवायला हवी. सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या खूप खूप शुभेच्छा! जय हिंद,जय भारत, वंदे मातरम्

**..लेखिका**
**सौ.ज्योत्स्ना भास्कर बन्सोड**

# युवा प्रतिष्ठान पुरस्कार सोहळा परिते येथे उत्साहात संपन्न .

परिते प्रतिनिधी  युवा क्रांती प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य परिते यांच्या वतीने ऑगस्ट क्रांतीदिनाचे औचित्य साधून  भव्यदिव्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्सहात परिते येथील हरिप्रिया सभागृहात नुकताच संपन्न झाला . सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा . प्रा किसनराव  कुऱ्हाडे अध्यक्ष शिवराज कॉलेज गडहिंग्लज हे लाभले होते प्रमुख पाहुणे म्हणून डॉ मेघाताई  संतोषराव डहाळे जिल्हा अध्यक्षा शिवराज प्रतिष्ठान अहिल्यानगर या लाभल्या होत्या .तर उदघाटक मा पत्रकार लेखक कवी सरकार




इंगळी यांचे हस्ते करण्यात आले तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ श्रीकांत पाटील प्रसिद्ध कांदबरीकार लेखक घुणकी हे लाभले होते .  प्रतिमा पुजन जेष्ठ कवी, लेखक, पत्रकार बाळासाहेब तोरस्कर ठाणे यांचे हस्ते करण्यात आले . . त्याच प्रमाणे  पत्रकार रेखा दिनकर पाटील उपस्थीत होत्या . सुत्रसंचलन कवी दिपक पवार सर रुकडी यांनी तर स्वागत आयोजक लखन कांबळे यांनी केल .

कार्यक्रमाच्या निमित्ताने मान्यवरांनी ज्यांना पुरस्कार मिळाले त्यांचे भरभरून कौतुक व अभिनंदन केले तसेच त्यांनी आपले सर्वांना मौलिक मागदर्शन केले . या सोहळ्यास महाराष्ट्रील दूरदूरच्या अनेक जिल्ह्यांमधून विविध क्षेत्रात  कार्यरत असलेले पुरस्कारार्थी आले होते.

# मनपा शाळेतील मुले गिरवत आहेत जर्मन भाषेचे धडे !

महाराष्ट्र राज्यातील विविध क्षेत्रांतील कुशल मनुष्यबळाचा उपयोग करून रोजगारनिर्मिती व नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्य शासनाने जर्मनीतील बाडेन-वुर्टेमबर्ग राज्याशी सहकार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. युरोपीय देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत असून, महाराष्ट्रातील उपलब्ध मनुष्यबळ ही गरज पूर्ण करू शकते. २०१५ पासून 'Sister State Relationship' अंतर्गत दोन्ही राज्यांमध्ये सामाजिक, आर्थिक व तांत्रिक सहकार्य सुरू आहे. या पार्श्वभूमीवर तंत्रज्ञान, उच्च व तांत्रिक शिक्षण, उद्योग, आरोग्य, वाहतूक, कृषी व वैद्यकीय शिक्षण या क्षेत्रांत परस्पर सहकार्याचा विस्तार करण्यासाठी प्रयत्न होणार आहेत. शासननिर्णयानुसार, या उपक्रमांतर्गत साधारणपणे १०,००० कुशल मनुष्यबळ त्या राज्यात पाठवण्याची योजना आहे. यासाठी भाषा प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकास, नोकरीसंबंधित आवश्यक प्रशिक्षण व प्रमाणपत्रे देण्याची जबाबदारी संबंधित विभागांवर असेल. तसेच, स्थानांतरण, विमा, कराराच्या अटी, जर्मन भाषेचे प्रशिक्षण याबाबत स्पष्ट नियोजन करण्यात येईल. या करारामुळे महाराष्ट्रातील युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या नव्या संधी मिळतील, तांत्रिक प्रगती होईल आणि राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. या संपूर्ण प्रक्रियेसाठी संबंधित सर्व विभागांचे समन्वय साधून नियोजन करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. NEP 2020 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे भारताचा नागरिक हा 'जागतिक नागरिक' म्हणून घडला गेला पाहिजे. या दृष्टिकोनातून बहुभाषिक होणे आणि जगातील विविध भाषा अवगत करणे हे अतिशय महत्त्वाचे ठरते. त्यानिमित्ताने,





देवनार कॉलनी मनपा इंग्रजी शाळा क्रमांक १, गोवंडी येथील मुले 'आनंदी शनिवार' या उपक्रमांतर्गत आठवड्यातून एक दिवस जर्मन भाषा शिकत आहेत आणि ती उत्स्फूर्तपणे अवगत करण्याचा प्रयत्न करत आहेत. ज्याप्रमाणे इंग्रजी भाषा शिकताना सुरुवातीला मुळाक्षरे, त्यानंतर प्राण्यांची नावे, पक्ष्यांची नावे, अंकांची नावे, वस्तूंची नावे अशा क्रमाने शिकवली जातात, त्याच धर्तीवर ही मुलेही जर्मन भाषा आवडीने शिकत आहेत. त्यांच्यामध्ये एक प्रकारची उत्सुकता आहे. एखाद्या शब्दाचा जर्मन भाषेत पर्याय शोधण्याचा ते प्रयत्न करतात आणि त्यामुळे प्रत्येक शनिवारची त्यांना आतुरता असते. काही मुले स्वतःहून नवीन शब्द शोधून काढतात. तसेच स्वतःची ओळख सांगणे, आपल्या वडिलांविषयी माहिती देणे, छोटेखानी संभाषण करणे अशा कृतींचे व्हिडिओ ते व्हॉट्सॲप ग्रुपवर किंवा शिक्षकांना पाठवतात. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचे इयत्ता आठवीपासून जर्मन भाषेची पुस्तके उपलब्ध आहेत; परंतु अशा विद्यार्थ्यांना ही भाषा सुरुवातीपासूनच अवगत व्हावी आणि कोणत्याही प्रकारची लेखी किंवा तोंडी परीक्षा न घेता हसत-खेळत शिकता यावी, यासाठी उपक्रमाचे शिक्षक श्री. संतोष विष्णू यादव यांनी पुढाकार घेतला आहे. "जर्मन भाषेची लिपी ही इंग्रजी भाषेसारखीच असल्यामुळे ती मुलांना सहज अवगत होते. लिहिण्यास कोणतीही अडचण येत नाही आणि त्यामुळे त्या भाषेची गोडी लवकर लागते," असे श्री. संतोष यादव यांनी सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## रस्त्यांची दुरवस्था: एक गंभीर आव्हान



भारतात दरवर्षी रस्त्यांच्या निर्मिती आणि दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात, तरीही रस्त्यांची स्थिती समाधानकारक नाही. अनेक शहरे आणि ग्रामीण भागांमध्ये आजही खराब रस्त्यांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. याचा परिणाम केवळ प्रवासाच्या वेळेवर किंवा वाहनांच्या दुरुस्तीवर होत नाही, तर यामुळे जीवघेणे अपघात होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागतो. खराब रस्त्यांमुळे वाहनांचा वेग मंदावतो, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते आणि प्रवासाचा वेळ वाढतो. यामुळे नागरिकांना वेळेवर पोहोचता येत नाही, महत्त्वाच्या भेटी किंवा कामे चुकू शकतात आणि रेल्वे किंवा बससारखी सार्वजनिक वाहतूक चुकण्याची शक्यता वाढते. खराब रस्त्यांमुळे वाहनांची झीज जास्त होते आणि ती वारंवार नादुरुस्त होतात. यामुळे वाहन मालकांना दुरुस्तीसाठी अतिरिक्त खर्च करावा लागतो.

अपघात आणि जीवितहानी:- खड्डे आणि खराब रस्त्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढते. यामुळे केवळ नागरिक जखमी होत नाहीत, तर अनेकवेळा जीवही जातो. ही आकडेवारी सातत्याने वाढत आहे, जी अत्यंत चिंताजनक आहे. वेळेवर न पोहोचल्यामुळे किंवा वाहतूक कोंडीमुळे व्यावसायिक आणि वैयक्तिक कामांमध्ये अडथळे येतात, ज्यामुळे मोठे आर्थिक नुकसान होते. खराब रस्त्यांमुळे होणाऱ्या त्रासामुळे नागरिकांना मानसिक ताण आणि चिडचिड वाढते.

सरकारची उदासीनता आणि जनतेचा आक्रोश:- सत्ताधारी पक्ष आपल्या कामांचा कितीही गाजावाजा करत असले, तरी रस्त्यांच्या प्रश्नावर त्यांचे गांभीर्य दिसत नाही. दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च होऊनही रस्त्यांची समस्या सुटत नाही, यावरून प्रशासकीय पातळीवरील उदासीनता आणि गैरव्यवस्थापन स्पष्ट होते. नागरिकांमध्ये खराब रस्त्यांविषयी तीव्र संताप आहे, परंतु त्यांच्या संयमामुळे सरकार याकडे पुरेसे लक्ष देत नाही असे दिसते. अनेकवेळा असे दिसून येते की, खराब रस्त्यांमुळे सर्वसामान्य नागरिकांना जीव गमवावा लागतो, पण सत्ताधारी किंवा उच्चपदस्थ व्यक्तींना याचा थेट फटका बसत नाही. "खराब रस्त्यांमुळे कुठल्या आमदार, खासदार, मंत्र्यांचा मृत्यू झाल्याचे ऐकिवात नाही."

कंत्राटदार आणि जबाबदारीचा अभाव :- रस्त्यांच्या कामांचे कंत्राट घेणारे ठेकेदार अनेकदा निकृष्ट दर्जाचे काम करतात आणि त्यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई होताना दिसत नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे. 'खड्डेमुक्त महाराष्ट्र' किंवा 'खड्डेमुक्त मुंबई' यांसारख्या घोषणा केवळ कागदावरच राहिल्या आहेत असे दिसते. मोठ्यामोठी आश्वासने देणारे नेते आता या दुरवस्थेबद्दल गप्प का आहेत, हा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे.

कंत्राटदारांवर कठोर नियम लादणे आणि त्यांच्या कामाची नियमित तपासणी करणे हे सरकारचे काम आहे. परंतु, भ्रष्टाचार आणि जबाबदारीचा अभाव यामुळे यावर नियंत्रण ठेवले जात नाही. जोपर्यंत कंत्राटदारांवर कठोर कारवाई केली जात नाही आणि त्यांना त्यांच्या कामासाठी जबाबदार धरले जात नाही, तोपर्यंत रस्त्यांची समस्या कायम राहणार आहे.

केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी हे चांगले रस्ते तयार करण्यासाठी प्रयत्नशील असले, तरी त्यांच्या प्रयत्नांचा फायदा प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्गांवर दिसतो. मात्र, शहरातील आणि ग्रामीण भागातील अंतर्गत रस्त्यांची स्थिती आजही फारशी सुधारलेली नाही.

पुढील वाटचाल या समस्येवर तोडगा काढण्यासाठी नागरिकांनी अधिक सक्रिय होण्याची गरज आहे. सरकारवर दबाव आणण्यासाठी आंदोलने, जनहित याचिका किंवा सोशल मीडियाचा वापर करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, कंत्राटदारांना जबाबदार धरण्यासाठी आणि त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी प्रशासनाने कठोर पाऊले उचलणे महत्त्वाचे आहे.

**राजेंद्र चौधरी.**
**रोझोदा. ता. रावेर, जि. जळगाव.**
**मो, ७७००९८२७६५**

## गांधी बाल मंदिर मध्ये हर घर तिरंगा रॅली..







भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम ,देशाभिमान ,शिस्त ,अनुशासन या गुणांची जोपासना व्हावी या उदात्त हेतूने गांधी बालमंदिर हायस्कूल कुर्ला मध्ये तीन महाराष्ट्र बटालियन एन. सी सी आर्मी युनिट, आर.एस पी. स्काऊट गाईडच्या वतीने हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेचे मुख्यध्यापक अनिल पांचाळ सर विनोबा भावे पोलीस ठाणे येथील श्री.भाऊसाहेब वराडे, अरुण बडगुजर ,सदाशिव पुजारी ,संजय लेंगरे,प्रमोद नागपुरे हे अधिकारी सदर रॅलीमध्ये उपस्थित होते. या वेळी एनसीसी, आर एस पी स्काऊट गाईड कॅडेटनी खूप छान घोषणा दिल्या. देशाभिमान सर्व वातावरण दरवळून गेले होते सदर कार्यक्रमात रत्नकांत विचारे सर, अवधूत चव्हाण सर, अमोल जागले सर ,घनश्याम जोशी सर,अर्चना सातपुते मॅडम हे शिक्षक उपस्थित होते. सदर रॅलीचे आयोजन शाळेचे एन सी सी ऑफिसर व शिक्षक श्री विश्वनाथ पांचाळ सर यांनी केले होते.

## गणपती बाप्पा चे आवाहन !!

(नाट्य रुपांतर)

मुंबईतील एका प्रसिद्ध श्री गणेश मंडपात तरुण मंडळी आणि जेष्ठ नागरिक मंडळी ही सजावट मनासारखं पूर्ण झाल्याच्या आनंदात - समाधानात 'बुधवार' च्या पहाटे "चहा बिस्किट" चा आस्वाद घेत, आज सकाळी सकाळी आपल्या बाप्पाचं दर्शन- देखावा लोक पाहतील. आपले नाव होईल, आपल्याला "व्हाटसअॅपवर- फेसबुकवर आणि टिव्ही चॅनेलवर" प्रसिद्ध मिळेल. किती छान ना , किती आनंद ना ! अशा प्रकारे एकमेकांत चर्चा होत असताना, अचानक सर्व लाईट बंद होते. आणि फक्त, आणि फक्त "गणेश मूर्तीवर" प्रकाश दिसत होता. आणि आवाज आला, " प्रिय भक्तांनोऽऽऽ, इकडे लक्ष द्या, मी, मी गणेश, तुमच्या सर्वांच्याच लाडका गणपती बाप्पा बोलतोयऽऽऽ. " सर्वजण एकमेकांकडे पाहत, ओरडायला- रागात बोलायला लागले. कोण भंकस करतोय ? कोणाला मस्ती आलेय ? आधी लाईट लावा ? आणि कोण आवाज काढतोय ? डोक्यात जाऊ नका ? कोण आहे, त्याने समोर या ? असे जेष्ठ नागरिक आणि मुलं- मुली तसेच, प्रौढ माणसे ओरडायला लागले. तेव्हा पुन्हा एकदा "गणेश मूर्ती" वर ची लाईट चमकली. आणि आवाज घुमू लागला. " प्रिय भक्तांनोऽऽऽ, मी तुमचा गणेश, गणपती बाप्पा , पार्वती शंकराचा सुपुत्र, आणि कार्तिकचा छोटा भाऊ, तुमच्या सर्वांच्याच लाडका गणपती बाप्पा बोलतोयऽऽऽ." सर्वांना आश्चर्य वाटले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर 'आनंद' ओसंडून वाहत होते. तेव्हा जेष्ठ नागरिक कुलकर्णी नाना म्हणाले, " देवा, आमचे काही तरी चुकले आहे का ? " गणेश, गणपती बाप्पा बोलू लागले, " अरे मी तुमच्यावर प्रसन्न झालो आहेऽऽऽ. कारण तुम्ही सगळ्यांनी, इतकी खुप मेहनत घेतली, सजावट केली. आणि आता १० दिवस सेवा करणार आहात. खरचं मी मनापासून आनंदी आहे, पण दुःखी ही आहेऽऽऽ. " " दुःखी आहे ???? " असे सर्वच उपस्थितांमध्ये ओरडू लागले. " माझ्या भक्तांनो, शांत व्हा. मी त्याचे कारण हि सांगतोऽऽऽ. तुम्ही मला आणताना, रस्त्यावर ट्रॅफिक जाम होते. लोकांना जाता येता त्रास होतो. सगळे कामधंदे वाले आहेत. नोटा बंदीमुळे- करोनामुळे नोकरीचे टेन्शन आले आहे. पण त्यातील कोणी बोलत नाही. पण आपण मात्र समजून घेतले पाहिजे ना. तेव्हा माझे आवाहन आहेऽऽऽ. " " क्या बात है देवा ? " केळे वाला राजू भैया अती उत्साहाने म्हणाला. तेव्हा बाप्पा बोलू लागला, " आधी माझी छोटीशी मुर्ती, पुढच्या वर्षापासून आणा. तुमच्या उंचीच्या चढाओढीत माझेच हाल होत आहेत. त्यामुळेच, म्हणजे लोकांना त्याचा त्रास होणार नाही. कारण की, मागे आठ वर्षांपूर्वी रस्त्याच्या खड्ड्यातून, मी सुध्दा सुटलो नाही.आणि आता तुम्हाला माहीत असेलच, दहा वर्षापूर्वी "मोबाईल- बातमी चॅनल द्वारे" पाहिले असेल की, सुरत मध्ये माझी २९ फुटांची मोठी मुर्ती आणताना, वरच्या खांबाच्या विजेच्या तारेचा, माझ्या मुकूटाला धक्का लागला. आणि दहाजणांना झटका बसला. तीन जण जागीच मृत्यू आणि, सातजण गंभीर जखमी झाले होते. पण मी मात्र, काहीच करू शकलो नाही. म्हणूनच पुढच्या वर्षापासून सर्वांनीच, छोटी मुर्ती आणा. दुसरी गोष्ट म्हणजे, तुम्ही जी वर्गणी गोळा करता, ह्या महागाईच्या काळात, कोणाला जमते, तर कोणाला नाही जमते. काहींच्या नोटा बंदीमुळे, आणि करोनामुळे नोक-या गेल्या आहेत. त्यामुळे ते कसं तरी संसार चालवत आहेत. पण ते जे काही स्वखुशीने देतील, तेच घ्या. " " पण देवा , " खजिनदार गोपीनाथ मध्येच बोलू लागले. " पण देवा, अशाने सजावटीचा- लाईटचा- डिजेचा- ढोलताशाचा- ऑर्केट्राचा खर्च कसा काय निघणार बुवा ? " तेव्हा बाप्पा शांतपणे म्हणाला, " भक्तांनोऽऽऽ, तुम्हाला मी प्रसन्न व्हायला पाहिजे ना ? " " होय महाराजा " चंदू आणि मंजू हात जोडून ओरडले. बाप्पा पुढे बोलू लागला, " तर मग, डिजे लावूच नका. आजारी ग्रस्त व विद्यार्थी आणि लहान बाळांना- वृद्धांना त्यांचा त्रास होत असतो. तसेच इतर लोकांना हि हृदय त्रास होत असतो. याचा आपण सगळ्यांनी भान ठेवावे. मग मी सांगतो तसे करालऽऽऽ ? " " बोला, बोला बाप्पा." अप्पाने हाक दिली. " भक्तांनोऽऽऽ, तुम्ही जी वर्गणी गोळा करून, जो मोठा खर्च करता, त्या पेक्षा "गोरगरीबांनांच्या आरोग्य खर्च- त्यांच्या शैक्षणिक खर्च- दुष्काळग्रस्तांना- पूरग्रस्तांना"----' इतक्यात, आबा पाटील मिशीला ताव मारत म्हणाले, देवा, " ते तर आम्ही करतोच की. " " अरे मला माहीत आहे. पण पुढे तर ऐकाल की नाही ? " आबा पाटीलला मध्येच थांबण्याचा इशारा बाजूवाल्यांनी दिला. पुढे बाप्पा बोलू लागले, " "शहिदांच्या घरांना- आदिवासींना, तसेच गरीबांना आणि होतकरु विद्यार्थ्यांना- खेळाडूंना मदत" करा. तसेच "समाजातील समाज सेवकांचा- खेळाडू- विद्यार्थी- साहित्यिक- समाज प्रबोधनकार कवींचा, तसेच पर्यावरणकारांचा सत्कार- पुरस्कार" देऊन, त्यांना प्रोत्साहित करा. माझा फोटो, आणि तुमचा फोटो पदाधिकारी च्या नावासकट बॅनर लावून, मदतीचा 'जनजागृती' चा जागर एखाद्या पक्षाप्रमाणे करा. त्यामुळे माझ्या सोबत, तुमच्या मंडळाचे नाव होईल. आणि आपल्या माहिती प्रमाणे, "व्हाटस्ॲपवर- फेसबुकवर- नी चॅनेलवर" प्रसिद्धी मिळेल. हा खरा माझ्यासाठी जागृत "देखावा" आहे. आणि ते पाहून दुसरे गणेश मंडळे ही अशा प्रकारे, "मदतीला" धावून येतील. ज्या राष्ट्रपुरुषांनी आपल्याला जी शिकवण दिली आहे, त्याची अमलबजावणी कृतीतून करण्यासाठी, ज्या "मुलींवर- महिलांवर आणि कोणाच्या घरावर" अत्याचार होत असेल तर, जात- धर्म पाहू नका. त्यांना कायद्याने न्याय मिळवून देण्यासाठी, माझ्या "झेंडाच्या बॅनरचा" वापर करून, रस्त्यावर एकत्र या. कोणाकोणावर गावात- शहरात अत्याचार- अन्याय होत असेल तेव्हा, सर्व "गणेश मंडळांनी पुढाकार" घेऊन, कोणतेही नुकसान न करता, कायदेशीर न्याय मिळवून द्यावा. हिच खरी तुमची गणेश शक्ती दिसेल, आणि मला आपली भक्ती मिळेलऽऽऽ. " " व्हय देवा, तुम्ही जसं बोलताव तसं आम्ही करताव." असे मन्या मान हालवून म्हणाला. " आणि अजुन एक काम करा--- ' " बाप्पा आतुरतेने- अपेक्षेने म्हणाला. " काय ता देवा ? " बबन्या काळजीने म्हणाला. बाप्पा पुढे बोलू लागला, " या पुढे, पुढच्या वर्षापासून, गावात- खेड्यात- शहरात व कॉलेनीत आणि चाळीत अनेक मुर्तींची एकच मुर्ती. म्हणजेच १२ गणपती वाल्यांची, एकच गणेश मूर्ती. ती पण छोटी . आणि ती ही मातीची असावी. म्हणजे "नदी- तलाव- समुद्राला" दुषितपणा न करता, कृत्रिम तलाव करुन, माझं विसर्जन करा. आणि त्या मातीत नवीन रोपे लावा. म्हणजे पर्यावरणालाही जपले जाईल. त्यामुळे तिथे खरा उत्सव साजरा करायला- जत्रा पहायला मिळेल. तो खरा आनंद. ती खरी श्रद्धा, ती खरी भक्तीऽऽऽ. जेणेकरून कोणाला त्रास होणार नाही. आवाज नाही. वर्गणी ही स्वखुशीने देतील. "जल- वायू- ध्वनी" प्रदुषण होणार नाही. त्यामुळे खर्च कमी, आणि मदत जास्त मिळेल- करता येईल. आणि त्यात आनंद- उत्साह अधिकऽऽऽ. आणि विशेष म्हणजे, उत्सव व एकोपा दिसेल. हे माझे छोटसं आवाहन सर्व "गणेश मंडळांना" आहे. ते आपण स्विकारल काऽऽऽ ? " मंडळाच्या सर्व सभासदांनी ओरडून साद दिली. " होय महाराजा !! " " माझे प्रत्येक जाती धर्माचे भक्त आहेत. पण---' " बाप्पा नाराजीत बोलू लागला. " आता पण काय देवा ?" सर्वांना चहा बनवून देणारी, गोंद्या आक्का आजी बोलू लागली. तेव्हा बाप्पा नाराजीत बोलू लागले, " पण जे तोंडात तंबाखू , ओठात सिगारेट, आणि पोटात दारू , तसेच गाडी चालवताना, हॅम्लेट न घालता ईकडे तिकडे थुंकणारेऽऽऽ , आणि कानाला हेडफोन लावणारे, असे माझे भक्त होऊच शकत नाही. माझे भक्त कसेऽऽऽ ? " " सांगा देवा, आपले भक्त कसे आहेत ? " अण्णा शेठ नी विचारले . आता बाप्पा समजावून अभिमानाने सांगू लागले, " माझा भक्त असा आहे, जो जातीचा भेदभाव न करणारा, जो आपल्या आई वडिलांना सांभाळणारा, मित्रत्वाचे नातं जपणारा, संकटात प्रत्येकाला मदत करणारा, प्रत्येक घराजवळ झाडे लावणारा, पाण्याची- विजेची व कचराची बचत करणारा, आपला परिसर स्वच्छ ठेवणारा, निसर्गावर प्रेम करणारा, माणुसकीचा धर्म पाळणारा हा माझा खरा भक्त- मित्र आहेऽऽऽ. " " होय महाराजा !! " असे सर्वांनीच साद ला प्रतिसाद दिला. तसेच, प्रत्येक मंडळाने माझ्या महाआरतीलाऽऽऽ प्रथम देशाचा शेतकरी नंतर दयाळू डॉ, पोलिस, पोस्टमन, हुशार विद्यार्थी, खेळाडू, शास्त्रज्ञ, निस्वार्थ वकील, सफाई कर्मचारी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ता आणि साहित्यिक व कवी यांच्या हस्ते करण्यात यावी. काही मंडळांनी काही पुरुषांना व काही मंडळांनी महिलांना मानाचं स्थान द्यावेऽऽऽ. तसे खान चाचा आनदात म्हणाले, ये तो बहुत अच्छा है ना ! पुन्हा पुढे बाप्पा बोलू लागले, "आणि हे सर्व आपली नोकरी- घर- तब्येत सांभाळून कराऽऽऽ. आणि माझ्या दर्शनासाठी, येणाऱ्या प्रत्येक भाविकांनाऽऽऽ भक्तांना धक्का बुक्की न करता, त्यांना सुरक्षित- संरक्षण देऊनऽऽऽ, चोरट्यांपासून सावधपणे लक्ष ठेवून, मनोभावे दर्शन द्यावेऽऽऽ. भक्त खुश तर मी खुश, आणि मी खुश तर गणेश मंडळे खुश ! तथास्तूऽऽऽ !! " असे म्हणताच, सर्वीकडे आपोआपच "विद्युत रोषणाई" झाली. तसे सगळेजण जल्लोषात टाळ्या वाजवून, शिट्ट्या वाजवून म्हणाले, गणपती बाप्पा मोरया सर्वांनी निसर्गावर प्रेम करुया !!

**संकल्पना- कथा- लेखक?**
**~शब्दश्री विलास देवळेकर**

## नवीन माध्यमिक विद्यालय, पारंबी तालुका मुक्ताईनगर जिल्हा जळगाव येथे सामूहिक पसायदान








नवीन माध्यमिक विद्यालय पारंबी तालुका मुक्ताईनगर येथे मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या 750 व्या सप्तशतकोत्तर जयंती महोत्सवी वर्षानिमित्त विद्यालयातील इयत्ता 8 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांनी तसेच मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सामूहिक पसायदान म्हटले. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक डॉ.शिवचरण उज्जैनकर यांनी मुक्ताईनगर तालुक्यात 11 शाळांमध्ये मागील पाच महिन्यापूर्वी ओळख श्री ज्ञानेश्वरीची ह्या महा उपक्रमास प्रारंभ केलेला आहे यासाठी आळंदी संस्थांचे विश्वस्त त्याचप्रमाणे ओळख श्री ज्ञानेश्वरी हा महा उपक्रम राबवणारे श्री ज्ञानेश्वरी चरित्र समितीचे अध्यक्ष श्री प्रकाश काळे, श्री विलास वाघमारे, श्री तुकाराम गवारी, श्री विकास शिवले, श्री अर्जुन मेदनकर व त्यांचे सहकारी या उपक्रमात मुक्ताईनगर तालुक्यातील नवीन माध्यमिक विद्यालय, सुकळी नवीन माध्यमिक विद्यालय,पारंबी, शिवाजी हायस्कूल कुऱ्हा काकोडा, स्वर्गीय अशोक फडके माध्यमिक विद्यालय, कुऱ्हा काकोडा, श्री शिवाजी हायस्कूल, वडोदा डॉ. जगदीश दादा पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, मुक्ताईनगर, आदर्श इंग्लिश मीडियम स्कूल, मुक्ताईनगर संत मुक्ताबाई माध्यमिक विद्यालय, मुक्ताईनगर श्री एस. बी. चौधरी विद्यालय, चांगदेव या शाळांमध्ये ओळख श्री ज्ञानेश्वरीची हा उपक्रम राबवण्यात आला याप्रसंगी आळंदी येथील मान्यवर उपस्थित होते यामध्ये त्या शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांकडून दर शनिवारला ज्ञानेश्वरी, हरिपाठ व पसायदान घेतात डॉ.शिवचरण उज्जैनकर यांनी 4 जानेवारी 2025 रोजी आळंदी येथे संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या 750 व्या सप्तशतकोत्तर जन्म महोत्सवी वर्षानिमित्त तसेच आदिशक्ती संत मुक्ताबाई यांच्या 745 व्या सप्तशतकोत्तर जन्म महोत्सवी वर्षानिमित्त शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर तर्फे तिसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलनाचे मोठ्या थाटात व उत्साहात आयोजन करून यशस्वी केले. ही सुद्धा आठवण डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी विद्यार्थ्यांना याप्रसंगी करून दिली.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संतोष पाचपोळ सर ज्येष्ठ शिक्षक डॉ.शिवचरण उज्जैनकर शिक्षक तथा विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री संतोष ठाकूर सर श्री रोहन आठवले सर व शिक्षकेतर श्री रघुनाथ इंगळे व श्री विनायक इंगळे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यावर मोठं संकट, हवामान खात्याचा थेट अलर्ट, पुढील ५ दिवस धोक्याची

ऑगस्ट महिन्यांच्या सुरूवातीला पाऊस कमी झाल्याचे चित्र राज्यात होते. आता परत एकदा पावसाने जोर धरलाय. काल काही भागात पावसाने हजेरी लावलीये. हवामान विभागाकडून 13 ते 15 ऑगस्टपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला. राज्यातील अनेक भागात आज जोरदार पावसाने हजेरी लावलीये. सकाळी पाऊस सुरू असल्याने ऑफिसला निघालेल्यांची आणि शाळकरी मुलांची चांगलीच तारांबळ उडाली. दिवसभरात पावसाचा जोरदार वाढण्याची शक्यता हवामान विभागाकडून देण्यात आलीये. सकाळी झालेल्या पावसामुळे अनेक रस्त्यांच्या पुराचे स्वरूप प्राप्त झालंय. मुंबई परिसरात मेघगर्जनेसह पाऊस सुरू आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, नाशिक, सातारा सांगली, छत्रपती संभाजीनगर,नांदेड, परभणी, बीड, सोलापूर, जळगाव, गडचिरोली या भागात देखील आज पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडूनही आज काही भागात येलो तर काही भागात ऑरेंज अलर्ट जाहीर करण्यात आलाय. कोकण, मराठवाडा, आणि विदर्भात पावसाचा अलर्ट

कोकणात आज जोरदार पाऊस हजेरी लावणार आहे. ऑगस्ट महिन्याच्या सुरूवातीला पावसाने पाठ फिरवल्यानंतर शेतकरी राजा चिंतेत होता. पिकांना पावसाची गरज होती. आता पावसाला



सुरूवात झाल्याचे बघायला मिळतंय. राज्यातील काही भागांमध्ये ऑगस्ट महिना आला असला तरीही म्हणावा तसा पाऊस झाला नसल्याचे चित्र बघायला मिळतंय. दरवर्षीपेक्षा यंदा राज्यात मॉन्सून लवकरच दाखल झाला होता. विशेष म्हणजे सुरूवातीच्या काळात दमदार पाऊसही झाला. हवामान विभागाने पुढील पाच दिवसांसाठी राज्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा काही भागांमध्ये दिला आहे. हवामान विभागाने महाराष्ट्राला मान्सूचा येलो अलर्ट जारी केलाय. मराठवाड्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. विदर्भाला देखील ऑरेंज अलर्ट देण्यात आलाय. पुढील पाऊस दिवस राज्यातील काही भागात अतिमुसळधार पाऊस होणार आहे. पुढील पाच दिवस राज्यासाठी धोक्याचे असणार आहेत.

घाट विभागात पावसाचा जोर वाढणार

बंगालच्या उपसागरातील कमी दाब प्रणालीमुळे राज्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेला पाऊस पुन्हा सक्रिय होत आहे. त्यामुळे पुढील दोन ते तीन दिवसात शहरासह घाट विभागात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे.

मुळशी धरणातून पुण्यासाठी पाणी पुरवठा, जलसंपदा मंत्र्यांचा निर्णय. मुळशी धरणातून वीज निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यापैकी नऊ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी पुण्याला वळवण्याचा निर्णय जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बुधवारी घेतला.

# अंथरवण पिंपरी आश्रम शाळेत शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम सपन्न

बीड ।प्रतिनिधी बीड पासून जवळच असलेल्या श्री सदुरु बंजारा सेवा संघ बीड संचलित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा तथा दीनानाथ बालक आश्रम अंथरवण पिंपरी (तांडा) ता. बीड येथे दिनांक १३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी शालेय गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य खंदारे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष दिनेशराव पवार, मुख्याध्यापक शिंदे सर, पर्यवेक्षक जवरे सर हे व्यासपीठावर



अग्रस्थानी होते. सर्वप्रथम हरितक्रांतीचे प्रणेते कै.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. तदनंतर मान्यवरांच्या शुभहस्ते निवासी व दीनानाथ बालकाश्रमच्या विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना दिनेशराव पवार म्हणाले की, मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर करून नियमितपणे अभ्यास करावा. कठोर परिश्रम जो करेल तोच यशाची फळे चाखेल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिंदे व्ही.एन. यांनी तर आभार प्रदर्शन पवार सर यांनी मानले. या कार्यक्रमास पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आश्रम शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# हुमणी अळीचा प्रकोप, सोयाबीन पीक धोक्यात...



प्रतिनिधी

मानोरा : मानोरा तालुक्यात हुमणी अळीच्या प्रकोपामुळे तालुक्यातील सुमारे ४० ते ५०% शेतकऱ्यांच्या शेतातील उभे असलेले, सोयाबीनचे पिके पिवळे पडत असून या नुकसानीचा भरणा सरकार कधी देईल याची वाट बघत आहे. नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पंचनामे सुरू नसून शेतकऱ्यांमधून संतप्त प्रतिक्रिया होत आहे. यावर्षी मानोरा तालुक्यात असंतुलित पावसामुळे सोयाबीन पिकाखालील क्षेत्र वाढले परंतु सध्या हुमणी अळीच्या या प्रकोपामुळे शेतकरी आर्थिक हवालदिल झाले आहे.

हुमणी अळीचा प्रकोप इतना तीव्र आणि प्रचंड आहे की संपूर्ण सोयाबीनचे पीक हे उध्वस्त करीत आहे.परिणामी शेतकरी फार मोठ्या संकटात सापडले असून या नुकसानाचा तात्काळ पंचनामा करून आर्थिक मदत देण्याची मागणी परिवर्तन शेतकरी संघटनेचे अध्यक्ष मनोहर राठोड यांनी बुधवारी (दि.१३ )केली आहे.

# डॉ.अनिकेत निंबोरे यांचे यश



आष्टी (प्रतिनिधी) डॉ. अनिकेत सोपान निंबोरे यांनी नुकतेच नवी दिल्ली येथील नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन द्वारे घेतलेल्या फॉरेन मेडिकल ग्रॅड्यूएट एक्झामीनेशन या परीक्षेत यश संपादन केले आहे. आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या ड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान रावसाहेब निंबोरे यांचे चिरंजीव डॉ. अनिकेत निंबोरे यांनी नुकत्याच झालेल्या एफएमजीई म्हणजेच फॉरेन मेडिकल ग्रॅड्यूएट एक्झामीनेशन या परीक्षेत उत्तम यश संपादन केले आहे. दिल्ली येथील नॅशनल बोड ऑफ एक्झामिनेशन द्वारे घेतलेल्या या परीक्षेचे वैद्यकीय क्षेत्रात महत्वाचे स्थान आहे. त्यांच्या या यशाबद्दल आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. किशोरनाना हंबर्डे, उपाध्यक्ष श्री. दिलीपशेठ वर्धमाने, सचिव श्री. अतुलकुमार मेहेर आणि सर्व संचालक मंडळाने तसेच सर्व स्टाफने प्राचार्य डॉ. सोपान निंबोरे व डॉ. अनिकेत निंबोरे यांचे अभिनंदन केले आह

# ई-पीक नोंदणीसाठी तांत्रिक बाबींमुळे शेतकऱ्यांना त्रास तात्काळ सुरळीत करा-दत्ता वाकसे

वडवणी ।प्रतिनिधी शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ साठी ई पीक पाहण्याची प्रक्रिया एक ऑगस्टपासून सुरू झाली आहे. मात्र मोबाईल अँपवर ई-पीक नोंदणीसाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. यातील तांत्रिक बाबी शेतकऱ्यांना समजत नसल्याने नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नोंदणी करताना ओटीपी वेळोवेळी मागितला जातो. प्रत्येक वेळी वेगवेगळ्या ओटीपी येत असल्याने पुढे जाता येत नाही. दरम्यान सर्व डाऊन झाल्यास सर्व प्रक्रिया नव्याने करावी लागते. याशिवाय या पमध्ये पिकाचे फोटो अपलोड करताना कमी एमबीचे लागतात. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी मोबाईलवर शेतात फोटो काढल्यास तो जास्त एमबीचा येतो. त्यामुळे तो अपलोड होत नाही परिणामी पुन्हा नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागत आहे. खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी एक ऑगस्ट १४ सप्टेंबर या कालावधीमध्ये ई पीक पाहणी करून घ्यावी लागणार आहे. जेणेकरून शासनाच्या पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी अनिवार्य आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कोणती पीक घेतले आहे. याचे अचूक माहिती पीक पाहणी प्रणाली द्वारे शासनाकडे नोंदविणे आवश्यक आहे.



मोबाईल अॅप मधील पाहणी मध्ये नोंदी केलेल्या पिकाची नोंद सातबारा उताऱ्यावर घेण्यात येणार आहे. यासाठी कोणत्याही प्रकारच्या कागदपत्रांची गरज भासत नाही. शेतकऱ्यांनी इतरांवर अवलंबून न राहता स्वतः पीक पाहणी करावी. यासंदर्भात अडचण आल्यास गावात नियुक्त करण्यात आलेल्या तलाठी, कृषी सहाय्यकांच्या मदतीने नोंदणी पूर्ण कराव्यात, परंतु तशा प्रकारे होताना दिसत नाही त्यामुळे शासन प्रशासन यांनी तात्काळ निर्णय घ्यावा त्याचबरोबर पच्या माध्यमातून होणाऱ्या त्रुट्या तात्काळ दुरुस्त करण्यात यावा असे देखील आवाहन मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केले आहे.

# जुगार अड्डावर स्थानिक गुन्हे शाखेचे स्वातंत्र्याच्या पूर्वदिनी छापे

## ११ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून २४ आरोपींवर कारवाई केल्याने जुगाऱ्यांमध्ये खळबळ !

बीड ।प्रतिनिधी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड जिल्हामध्ये चालणाऱ्या अवैध धंद्याची माहीती काढुन कारवाई करण्याचे आदेशित केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका दिवसात तीन जुगार अड्डावर छापा मारुन कारवाई केली. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने याचे पथकाने पोलीस ठाणे केज हद्दीत नांदुरघाट येथे दिक्षा किराणाच्या मागे चालणाऱ्या तिरट नावाचा जुगारावर छापा मारुन आरोपी बबलु सत्तार शेख, वय ३१ वर्ष, रा नांदुरघाट,अविनाश तुकाराम लोंढे, वय ३० वर्ष, नवनाथ निवृत्ती मगरे, वय ३८ वर्ष, बबन एकनाथ गायकवाड, वय ७० वर्ष, आकाश बापु शिंदे, वय २३ वर्ष, सुशिल शिवाजी त्रिमुखे, वय ४३ वर्ष, प्रकाश गेणबा जाधव, वय ४० वर्ष, चंदु दशरथ जाधव, वय ३० वर्ष, ऋषिकेश भिमा गायकवाड, वय २२ वर्ष, सर्व रा नांदुरघाट व विनोद देविदास हांगे, वय ३१ वर्ष, रा हांगेवाडी, ता. केज यांना पकडून त्याचे ताब्यातून तिरट जुगाराचे साहीत्य, नगदी, मोबाईल, मोटार सायकल असा एकुण २,६३,०६० मुद्देमाल हस्तगत करुन त्याचे विरुधद पोलीस ठाणे केज गु.र.नं ४३७/२०२५ कलम १२ (अ) मु.जुका प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. तसेच त्याच पथकाने पोलीस ठाणे दिंद्रुड हद्यीत तेलगांव ते परळी रोडलगत ईसार पेट्रोलपंपाचे मागे तिरट जुगार खेळणाऱ्या आरोपी दत्ता मधुकर लगड, वय ४२ वर्ष, अक्षय सुरेश लगड, वय २८ वर्ष, सचिन नारायण कटारे, वय ४५ वर्ष, पोपट प्रकाश सोनवणे, वय ३३ वर्ष,बळीराम नामदेव तिडके, वय ४५ वर्ष,अंकुश लक्ष्मण लगड, वय ४५ वर्ष सव रा तेलगांव याना पकडुन त्याचे ताब्यातुन



नगदी, जुगाराचे साहीत्य, मोटार सायकल मोबाईल असा एकुण २,१२,७०० रु मुद्देमाल जप्त करुन त्याचे विरध्द पोलीस ठाणे दिंद्रुड गु.र.नं २१२/२०२५ कलम १२ (अ) मुजुका प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे. तसेच पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर याचे पथकाने पोलीस ठाणे पेठ बीड येथील नागोबा गल्ली येथे तिरट नावाचा जुगार चालणाऱ्या अनुयावर छापा मारुन आरोपी अब्दुल फईल जलीम मोमीन, वय ४८ वर्ष, कृष्णा अशोक परळकर, वय २३ वर्ष, वैभव पांडुरंग तांगडे, वय २५ वर्ष, अमित शरद जोगदंड, वय २१ वर्ष, अकबर मुसा खॉन, वय ३९ वर्ष, राजु रवी क्षीरसागर, वय ३२ वर्ष,संकेत चंद्रकांत तांगडे, वय २८ वर्ष, शेख अमेर शेख अन्सार, वय २८ वर्ष, सर्व रा बीड यांना पकडुन त्याचे ताब्यातुन दुचाकी, मोबाईल, नगदी असा एकुण ६,३५,५७० रू मुद्देमाल हस्तगत करुन त्याचे विरुधद पोलीस ठाणे पेठ बीड गुर.नं २२८/२०२५ कलम ४,५ मु.जु.का प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे सदरील कामगिरी श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार, महेश जोगदंड, आनंद म्हस्के, विकास राठोड, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, बप्पासाहेब घोडके, अजु र्न यादव, आशपाक सय्यद, मनोज परजणे, चालक नितीन वडमारे, सुनिल राठोड, गणेश मराडे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com